पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ९७**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०८/०१/२०१९** **वेळ – दुपारी ०२.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार**, दिनांक **०८/०१/२०१९** रोजी दुपारी **०२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त(१), मा.गावडे – प्र.अतिरिक्त आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा अधिकारी, मा.पाटील, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.निकम, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.बोदडे, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.पंडित –

अधिष्ठता YCMH, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.सेठीया, मा.फुटाणे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.इंगुळकर – लेखाधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.४६) दि.२६ जानेवारी २०१९ रोजी कै.आण्णासाहेब मगर स्टेडियम नेहरूनगर, पिंपरी १८ येथे म.न.पा.शालेय विद्यार्थांचा देशभक्तीभर गीतांचा कार्यक्रम करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४७) स्वच्छ सर्वेक्षण २०१९ सिटी को-ऑर्डिनेटर अमृत या कंत्राटी पदावर नियुक्ती बाबत.

विषय क्र.४८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळाची (www.pcmcindia.gov.in) दिव्यांग पूरक संकेतस्थळ निर्मीतीसाठी "Best Accessible Website National Award" साठी दिल्ली येथे उपस्थित राहिल्याबद्दल झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.४९) मनपाचे उद्यान विभागाकडील उद्यान देखभाल कामांना निविदा अंतिम होईपर्यंत पुर्वी असलेल्या ठेकेदारास प्रपत्र अ प्रमाणे मुदतवाढ व त्यानुसार येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.५०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सीएसआर Activity राबविणेकामी यापुर्वी नेमलेल्या CSR Expert सल्लागार श्री.विजय वावरे यांना पुढील ५ माहिने कालावधी करीता मुदतवाढ देणेबाबत.

विषय क्र.५१) प्रभाग क्र.२९ व ३० यांचे हद्दीवरील महाराष्ट्र बँकेपासून ओरियाना बिल्डींग पर्यंत रस्ता करणेकरिता करावयांचे भूसंपादनासाठी महानगरपालिकेने सदर ठिकाणी शासकिय मोजणी करून मोजणी फी अदा करावी व सदरची रक्कम महापालिकेने सदर नागरिकांना जागेपोटी देय असणा-या रकमेतून वसुल करणेस मान्यता देणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५२) मनपाच्या शुटींग बॉल (व्हॉलीबॉल) संघासाठी आवश्यक किट (क्रिडा साहित्य) खरेदीस मान्यता देणेबाबत. मा.राजू मिसाळ, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव

----------

दिनांक २६/१२/२०१८, दि.०१/०१/२०१९ व दि.०४/०१/२०१९ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ९५)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -४०४१ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – ग क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे पत्र क्र.गक्षेका/आ/४/कावि/६८२/२०१८ दि.०१/१२/२०१८

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरापालिकेच्या कार्यक्षेत्रातंर्गत ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालय व मुता-यांची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करणेसाठी निविदा क्र.२/२०१८-१९ नुसार निविदा तयार करण्यात आलेली आहे. ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये सार्वजनिक शौचालय व मुता-यांची संख्या एकुण ५३८ सिट्स आहेत. मे. शुभम उद्योग यांनी अंदाजपत्रकीय दराच्या -२६.०१% कमी दराने दर सादर केलेला आहे. सार्वजनिक शौचालय व मुता-यांची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करणेसाठी सन - २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये खाजगीकरणाव्दारे साफसफाई या लेखाशिर्षावर र.रु.६,५०,८९,८९८/- इतकी तरतूद शिल्लक आहे. तरी सार्वजनिक शौचालय व मुता-यांची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करणेच्या कामास व येणा-या अंदाजीत र.रु.५६,००,०००/- (अक्षरी र.रू. छपन्न लाख फक्त) खर्चास तसेच सदरचा खर्च खाजगीकरणाव्दारे साफसफाई या लेखाशिर्षावर टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४२ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/२/कावि/११३२/२०१८ दि.०५/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-या ३ ते ५ वर्षाच्या आतील टुरिस्ट परमिट (पिवळे नंबर प्लेट) असलेल्या १३ टाटा सुमो अथवा तत्सम वाहने (६+१) भाडे तत्वावर घेणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई निविदा क्र.७/२०१८-१९ मधील लघुत्तम दर निविदाधारक ओम एन्टप्रायझेस यांचे प्राप्त दर प्रति वाहन प्रति दिन ८० कि.मी.साठी र.रू.१,४४६/- प्रमाणे व प्रति कि.मी. ८० पुढील अंतरासाठी र.रू.८.५० दर याप्रमाणे २ वर्षाकरिता र.रू.१,१२,७८,८००/-(अक्षरी र.रू.एक कोटी बारा लाख अठ्ठ्याहत्तर हजार आठशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४३ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – जलनि:सारण मुख्यालय

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२०७१/२०१८ दि.१८/१२/२०१८

विषय - प्रभाग क्र.२३ थेरगाव येथील बापुजीबुवानगर, संदीपनगर, इंद्रायणीनगर, जयमल्हारनगर, धनगरबाबा मंदीर परिसर, गुरुनानकनगर, ड्रायव्हर कॉलनी व इतर परिसरातील जलनि:सारण विषयक सुधारणा कामे करणे व जलनिःसारण नलिका टाकणेबाबत.

विषय क्र.०३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४४ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/३७०/२०१८ दि.१९/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा हद्दीतील रावेत येथील बंधारा बराच कालावधी पूर्वी तत्कालीन लोकसंख्या पाणी वापर भविष्यातील होणारे लोकसंख्या वाढ इ.प्रमाणे बांधण्यात आलेले होते. मनपा हद्दीलगत स्थापन करणेत आलेले औद्योगिक क्षेत्रामुळे मागील काही दशकांत मनपा क्षेत्रात विकास तीव्र गतीने होत असलेने लोकसंख्येतील वाढ कमी कालावधीत प्रमाणा पेक्षा खूप जास्त असलेचे दिसून येत आहे. रावेत येथील बंधा-या जवळ पिंपरी चिंचवड मनपाचे अशुध्द जलउपसा केंद्र आहे. सद्यस्थितीत रावेत येथील बंधा-यातून मनपा ४८० MLD, MIDC १२० MLD तसेच MJP ३० MLD जलउपसा करत आहे. रावेत येथील पवना नदीवरील बंधारा पाटबंधारे विभाग यांच्या अखत्यारित आहे. सदर बंधा-याचे देखभाल व दुरुस्तीची कामे पाटबंधारे विभागामार्फत करण्यात येते. सदर बंधारा जुन्या काळी बांधले असलेने सद्यस्थितीत येथे पाणी साठवणूक क्षमता जलउपसा चे अनुषंगाने कमी असलेचे पाटबंधारे विभागाकडील अधिका-यांचे पहाणी नुसार मनपास सूचित करणेत आलेले आहे. सध्या पाणी उपसा पूर्ण क्षमतेने होत असल्यामुळे कधी कधी बंधा-या मधील पाणी पातळी खाली जात आहे व त्याचा परीणाम पंपींगवर होवून पाण्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी वाढत आहेत. यासंदर्भात मा. आयुक्त सो. व मा. अधिक्षक अभियंता पाटबंधारे विभाग यांचे समवेत बैठक झाली असता रावेत बंधा-याचे वरील बाजूस नदीपात्राचे Contour plan आवश्यक असल्याचे पाटबंधारे अधिका-यानी सांगितले. तसेच यासाठी पाणलोट क्षेत्राचे सर्वेक्षण मनपा मार्फत करण्याचे ठरले आहे. सदर सर्वेक्षण मध्ये बंधा-याची उंची वाढविणे / खालील बाजूस नवीन बंधारा बांधणेचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने बंधा-याची वरील बाजूस (पाणलोट क्षेत्राची) धोक्याची पाण्याची पातळी तपासणे आवश्यक आहे. सदर काम तातडीने करणे

आवश्यक असल्यामुळे पाटबंधारे विभाग मार्फत ड्रोन सर्वेक्षण करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. सदर कामाची निकड व आवश्यकता लक्षात घेता अशा प्रकारे विशिष्ट सर्वेक्षणचे काम करणा-या Expert तज्ञांकडून कोटेशन घेणेत आले असुन निविदा न काढता सर्वात कमी कोटेशन दर र.रु.५,५०,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख पन्नास हजार फक्त) देणारे मे.राहुल देशमुख यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ अनुसूची प्रकरण ५ नियम २(२) च्या परंतु के नुसार निविदा न मागविता परंतु करारनामा करून थेट पद्धतीने काम देणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०१८-१९ चे अंदाजपत्रका मधील पाणीपुरवठा विशेष योजना निधी”या लेखाशिर्षा अतंर्गत पान. क्र.२४४ अ.क्र.३ अन्वये रावेत येथील जुन्या बंधा-याच्या खालील बाजूस नवीन बंधारा बांधणे या कामा अंतर्गत उपलब्ध तरतूद र.रु.५,००,००,०००/- इतकी आहे. तरी सदर ड्रोन सर्वेक्षणाचे काम निविदा न काढता सर्वात कमी कोटेशन (र.रु.५,५०,०००/- अक्षरी पाच लाख पन्नास हजार फक्त) देणारे मे.राहुल देशमुख यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३ अनुसूची प्रकरण ५ नियम २(२) च्या परंतु के नुसार निविदा न मागविता परंतु करारनामा करून थेट पद्धतीने काम देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४५ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – उद्यान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/३/कावि/१११०/२०१८ दि.२८/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाचे ठिकाणी क्युरेटर पदावर काम करणा-या श्री.दिपक सदाशिव सावंत यांना दरमहा र.रु.४५,०००/- प्रमाणे दिनांक १२/०७/२०१८ पासून १०/०९/२०१८ पर्यंत कालावधीकरिता मानधन तत्वावर नेमणूकीस मुदतवाढ देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४६ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – उद्यान

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/३/कावि/११०९/२०१८ दि.२८/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाचे ठिकाणी पशुवैद्यक या पदावर काम करणा-या डॉ.घनशाम मोहन पवार यांना दरमहा र.रु.४५,०००/- प्रमाणे दिनांक

०४/१०/२०१८ पासून १९/११/२०१८ पर्यंत कालावधीकरिता मानधन तत्वावर नेमणूकीस मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४७ विषय क्रमांक – ०७

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्र.आमुका/९/कावि/७०५/२०१८ दि.२८/१२/२०१८

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतुन वाहणा-या मुळा नदीपात्रातील हायसिंथ (जलपर्णी) काढून ८ महिने कालावधीत नदीपात्र नियमित स्वच्छ ठेवणे कामासाठी ई-निविदा नोटीस क्र.६/३/२०१८-१९ अन्वये ड, ह व ई क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मुळा नदीपात्रातील वाकड पुल (द्रुतगती मार्ग) ते पिंपळे निलख स्मशानभूमी, औंध सांगवी ब्रीज ते दापोडी हॅरीस ब्रीज व बोपखेलपर्यंत (म.न.पा.हद्दीतील मुळा नदीचे संपुर्ण पात्र) या कामासाठी प्राप्त झालेल्या ३ निविदांपैकी मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांनी म.न.पा. अंदाजपत्रकीय र.रु.१७,८७,२५४/- साठी सादर केलेला र.रु.१९,१२,३६२/- (+) ७% (अक्षरी र.रु.एकोणीस लाख बारा हजार तीनशे बासष्ट फक्त) हा लघुत्तम दर असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४८ विषय क्रमांक – ०८

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – प्रशासन

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१८/कावि/९७५/२०१८ दि.२९/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ३६ वा वर्धापन दिनासाठी अल्पोपहार व चहापान कार्यक्रमासाठी थेट पध्दतीने खरेदी करण्यात आली असुन त्यासाठी र.रु.२,१९,०२०/- (अक्षरी र.रु.दोन लाख एकोणीस हजार वीस फक्त) खर्च आला असुन त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०४९ विषय क्रमांक – ०९
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/७२०/२०१८ दि.२७/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध कन्सलटंट पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात क्र.२८४ दि.१२/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या मुलाखती दि.२९/१०/२०१८ रोजी घेऊन पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/५५८/२०१८, दि.२९/११/२०१८ देण्यात आलेला आहे. परंतु जी पदे पुर्ण क्षमतेने भरली गेली नाहीत अशी रिक्त पदे व नियुक्ती आदेश निर्गत करूनही विहित मुदतीत रूजू न झालेल्या रिक्त जागेकरीता दि.१७/१२/२०१८ रोजी Walk In Interview घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये खालील पात्र उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे.

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | पदनाम | प्रवर्ग | मानधन प्र.महिना |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. संजय रघूनाथ जाधव | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु. | वि.जा.अ. | ४५,०००/- |
| २ | डॉ. सचिन हरिभाऊ रेडे | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु. | खुला | ४५,०००/- |

वरील प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनावर आदेशाच्या तारखेपासून दिनांक २७/१२/२०१८ ते दि.२८/०५/२०१९ अखेर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५० विषय क्रमांक – १०
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/७०८/२०१८ दि.२४/१२/२०१८

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध कन्सलटंट पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहीरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेला आहे. परंतु जी पदे पुर्ण क्षमतेने भरली गेली नाहीत अशी रिक्त पदे व नियुक्ती आदेश निर्गत करूनही विहित मुदतीत रूजू न झालेल्या रिक्त जागेकरीता दि.१०/१२/२०१८ रोजी Walk In Interview घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये खालील पात्र उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | पदनाम | प्रवर्ग | मानधन प्र.महिना |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.प्रशांत सखाराम गाडे | न्युरो सर्जन | खुला | 70000/- |
| २ | डॉ.अनुराधा विनोद नायर | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | खुला | 60000/- |

वरील प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनावर आदेशाच्या तारखेपासून दिनांक 24/12/2018 ते दि.28/05/2019 अखेर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५१ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/६०३/२०१८ दि.२९/१२/२०१८

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.60/6/2018-19 अन्वये प्रभाग क्र.8 येथील तिरुपती ते स्पाईन रोड ते आर टी ओ कॉर्नर पर्यंत व इत्यादी ठिकणी रस्ता दुभाजक करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.लालदिप कन्स्ट्रक्शन नि.र.रू.83,36,642/- (अक्षरी र.रु.त्र्याऐंशी लाख छत्तीस हजार सहाशे बेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.82,18,129/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.82,18,129/- पेक्षा 18.18%कमी म्हणजेच र.रु.67,24,073/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,05,863/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.12,650/- = एकुण र.रु.68,42,586/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५२ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/BRTS/८०८/२०१८ दि.३१/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.53/5/2018-2019 अन्वये बी.आर.टी. कॉरीडॉर क्र.३ वर वाकड येथील पुणे - बेंगलोर महामार्गावरील पुलापासून हिंजवडी मनपा हद्दीपर्यंत रस्ता रुंदीकरण करणेकामी मे.कृष्णाई इन्फ्रा. प्रा. लि. नि.र.रू.19,58,95,701/- (अक्षरी र.रु.एकोणीस कोटी

अठ्ठावन्न लाख पंच्यान्नव हजार सातशे एक फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.19,46,31,900/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.19,46,31,900/- पेक्षा 4.95% जादा असा दर कमी करुन देण्यात आला असून त्यानुसार प्राप्त निविदा दर 4.95% जादा दराची सन 2018-19 चे एस.एस.आर.दरानुसार निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 7.11% ने कमी येत असल्याने निविदा दरापेक्षा निविदा 4.95% जादा दराने म्हणजेच र.रु.20,42,66,179/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.10,95,401/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,68,400/- = एकुण र.रु.20,55,29,980/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५३ | विषय क्रमांक – १३

दिनांक – ०८/०१/२०१९ | विभाग – इ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.विकास डोळस | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.इ/स्था/कावि/२/१/२०१९ दि.०१/०१/२०१९

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

इ विभागीय कार्यक्षेत्रातील सन २०१८-१९ साठी प्रभाग क्र.४ दिघी बोपखेल मधील आय.टू.आर.अंतर्गत ताब्यात आलेल्या जागेत बहुउद्देशीय इमारत बांधणे व जागा विकसित करणे या कामास अंदाजपत्रकीय र.रु.५,००,००,०००/- इतकी महानगरपालिका सभा ठराव क्र.१९६, दि.२२/०७/२०१८ चे अन्वये प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदरचे काम तांत्रिकदृष्ट्या वैशिष्ट्यपुर्ण असल्याने, प्रभाग क्र.४ दिघी बोपखेल मधील आय.टू.आर. अंतर्गत ताब्यात आलेल्या जागेत बहुउद्देशीय इमारत बांधणे व जागा विकसित करणे कामी तांत्रिकदृष्ट्या आवश्यकतेनुसार सर्व बाबींचा एकत्रित विचार करुन निर्धारीत मानंकनाप्रमाणे नियोजन करणे कामाची देखरेख करणे इ. निविदा पुर्व (निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची कार्यकारी अभियंता यांच्या मंजुरीनुसार दरसुची दि.१३/११/१८ रोजी मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार मनपाच्या पॅनेलवरील वास्तुविशारद श्री.मिलिंद किर्दत, पुणे (नियोजन कंसल्टंट) यांचेकडून १.९८% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. तांत्रिकदृष्ट्या आराखड्याप्रमाणे काम करुन घेणे, प्रकल्पाची दैनंदिन कामावर देखरेख करणे, निविदा निर्देशांनुसार गुणवत्ता तापसणी करणे इ. निविदा पुर्व व निविदा पश्चात कामे करणे हे चोखपणे होणे आवश्यक आहे. परिणामकारक दैनंदिन कामे व प्रकल्पाची कामे होणेकरिता सदर प्रकल्पास निविदा पुर्व व निविदा

पश्चात कामांवरील प्रकल्प सल्लागार नेमणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकल्पाची कामे केलेली आहेत व सध्या काही कामे प्रगतीपथावर आहेत. सबब प्रस्तुत कामासाठी निविदा पुर्व व निविदा पश्चात कामासाठी वास्तुविशारद श्री.मिलिंद किर्दत, पुणे (नियोजन कंसल्टंट) यांची नेमणुक करुन त्याकामी लागणारी फी ही मा.स्थायी समितीच्या मान्य ठरावापेक्षा (१.९८%) कमी दराने प्राप्त झालेली आहे. कोटेशननुसार प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकुण १.९८% (०.५०% निविदा पूर्व + १.४८% निविदा पश्चात) या दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५४ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/ /२०१९ दि. /०१/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.22/2/2018-19 अन्वये प्रभाग क्र.५ गवळीनगर व सॅन्डविक परिसरामध्ये डांबरीकरण करणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन नि.र.रू.83,69,243/- (अक्षरी र.रू.त्र्याऐंशी लाख एकोणसत्तर हजार दोनशे त्र्येचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.82,98,273/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.82,98,273/- पेक्षा 18.18% कमी म्हणजेच र.रु.67,89,647/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.12,721/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.58,250/- = एकुण र.रु.68,60,618/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५५ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/कावि/३८८/२०१९ दि.०१/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.55-2-2018-19 अन्वये प्रभाग क्र.3 च-होली

येथील च-होली मुख्य रस्ता (आझाद नगर) ते काळजेवाडी पर्यतचा १८ मी.डि.पी. रस्ता विकसित करणेकामी मे.एच.सी.कटारीया नि.र.रू.16,68,28,478/- (अक्षरी र.रु.सोळा कोटी अड्डुसष्ठ लाख अठ्ठावीस हजार चारशे अठ्ठयाहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.16,34,53,811/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.16,34,53,811/- पेक्षा 1.25% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन २०१८-१९ चे एस एस आर दरानुसार प्राप्त निविदा निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 10.02% ने कमी येत असल्याने, प्राप्त निविदा मंजुर दराने म्हणजेच र.रु.16,14,10,638/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.31,19,217/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.2,55,450/- = एकुण र.रु.16,47,85,305/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५६ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/शअ/तां/१४०/२०१८ दि.३१/१२/२०१८

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्थापत्य मुख्यालयामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणारे रस्ते, पावसाळी पाण्यासाठी वाहिनी व इतर स्थापत्य विषयक कामे, पूल, स्काय वॉक व इमारती यांचे कामाकरिता नि.नो.क्र.२२/१/२०१७-१८ अन्वये Expression of interest ची निविदा प्रसिध्द करणेत आली होती, त्यास अनुसरून टप्पा-१ मध्ये एकूण २५ इच्छुक सल्लागारांना सहभागी करून घेणेत आलेले आहे. टप्पा-२ मध्ये मे.राजेंद्र गडकरी अन्ड असोसिएटस सल्लागार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केलेली आहे. मे.राजेंद्र गडकरी अन्ड असोसिएटस सल्लागार यांना नव्याने नियुक्त करणेकामी त्यांच्या कामाचे वर्गवारी प्रमाणे १ ते ४ श्रेणीमध्ये प्रपत्र ब (पूल, स्काय वॉक व इमारती सल्लागार श्रेणी-२) या प्रमाणे प्रपत्र ब तयार करणेत आले आहे. टप्पा-२ मधील प्रपत्र ब प्रमाणे मे.राजेंद्र गडकरी अन्ड असोसिएटस सल्लागार यांना पॅनेलवर घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५७ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र क्र.मुलेप/६/कावि/१/२०१९ दि.०१/०१/२०१९

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१७.१२.२०१८ ते दि.२३.१२.२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१/२०१९ दि.०१/०१/२०१९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५८ विषय क्रमांक – १८
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – जलनि:सारण मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/२/कावि/२१४०/२०१८ दि.३१/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.3/30/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२४ थेरगाव येथील वनदेवनगर, बेलठिकानगर, थेरगाव फाटा परिसर व इतर परिसरातील जलनि:सारण विषयक सुधारणा कामे करणे व जलनिःसारण नलिका टाकणेकामी मे.कल्पना एंटरप्रायजेस नि.र.रू.59,99,985/- (अक्षरी र.रु.एकोणसाठ लाख नव्याण्णव हजार नऊशे पंच्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.59,99,906/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.59,99,906/- पेक्षा 24.04% कमी म्हणजेच र.रु.45,57,529/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.79/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.45,57,608/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०५९ विषय क्रमांक – १९
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – ड क्षेत्रीय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.डक्षे/३/कावि/८९६/२०१८ दि.२९/१२/२०१८

विषय - ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील म.न.पा.चे आरोग्य विभागाकडील सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने (पाण्याचे उच्चदाब फवा-याच्या सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व देखभाल करणेबाबत.

विषय क्र.१९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६० विषय क्रमांक – २०
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – ड क्षेत्रीय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.डक्षे/८/कावि/५५८/२०१८ दि.३१/१२/२०१८

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व कचरा कुंड्या, रस्त्याचे, गटर्सच्या कडेचे कच-याचे ढीग, मोकळ्या जागेतील कच-याचे ढीग उचलणे व त्याची वाहतुक करुन भोसरी स्थानांतर केंद्र अथवा मोशी कचरा डेपो येथे टाकणे या कामासाठी निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६ अन्वये आरोग्य विभाग ड क्षेत्रिय कार्यालया मार्फत निविदा प्रसिध्द करुन कामाचे दर मागविणेत आले होते. त्यानुसार मे.जयगणेश एंटरप्रायजेस यांनी भोसरी कचरा स्थानांतर केंद्रासाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,२५०/- व मोशी कचरा डोपोसाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,४५०/- या दराने ९ वाहने पुरवून काम करणेस मा.स्थायी समिती सभा यांनी ठराव क्र.१८०४०, दि.१५/१०/२०१६ अन्वये मान्यता दिल्याने त्यांचेशी दि.१५/१०/२०१६ रोजीचा सिलबंद करारनामा करणेत येवून मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील आदेश क्र.डक्षे/३/कावि/८०१/२०१६, दि.१७/१०/२०१६ अन्वये मे.जयगणेश एंटरप्रायजेस यांना कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. त्यानंतर प्रस्तावात नमूद प्रमाणे त्यांना मा.स्थायी समितीच्या मान्यतेने दि.३१/१२/२०१८ अखेर वेळोवेळी मुदतवाढ देणेत आलेली आहे. दि.०१/०१/२०१९ पासुन सदर कामाची आवश्यकता आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कचरा उचलणे व वाहतुक करणे या कामासाठी दि.१५/१०/२०१६ रोजी करणेत आलेला सिलबंद करारनाम्यातील अटी शर्ती कायम ठेवून दि.०१/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०१९ अखेर अथवा निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी यापैंकी प्रथम येणा-या कालावधी पर्यंत मे.जयगणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगांव यांनी भोसरी कचरा स्थानांतर केंद्रासाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४२५०/- व मोशी कचरा डोपोसाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १

वाहनचालकांसह र.रु.४४५०/- या दराने एकुण १४ टिपर/ट्रक वाहने पुरविणेस मान्यता देणेस व याकामी अंदाजीत अपेक्षीत खर्च र.रु.६०,००,०००/- (अक्षरी र.रू.साठ लाख फक्त) या येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६१ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – ड क्षेत्रीय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता (स्था) यांचे पत्र क्र.डक्षेका/३/कावि/८९७/२०१८ दि.२९/१२/२०१८

मा.कार्यकारी अभियंता (स्था) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (1 ते 4) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६२ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता (स्था) यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/कावि/१४४/२०१९ दि.०२/०१/२०१९

मा.कार्यकारी अभियंता (स्था) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग अ मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (1 ते 7) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६३ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ –मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/१९५/२०१८ दि.२१/११/२०१८

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (1 ते 17) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश

देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६४ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/२/२०१९ दि.०२/०१/२०१९

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक (जुने) वार्ड क्रं.४९, ५०, ५१ व ५३ तसेच "क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत निवडणूक (जुने) वार्ड क्रं.५८, ५९ व ६० मधील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी कामगार पुरविणे कामी देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे बाबतच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून सदरकाम पुर्ण होणेसाठी काही कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीत आरोग्य विषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, दापोडी यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०१/२०१९ते दि.३१/०३/२०१९ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्णहोऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणे व याकामी येणा-या अंदाजे र.रु.९९,३५,२७१/-(अक्षरी र.रु. नव्यान्नव लाख पस्तीस हजार दोनशे एकाहत्तर फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेबाबत मा.अति. आयुक्त (२) यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयात नमुद केलेल्या कामास येणा-या अंदाजे र.रू.९९,३५,२७१/- (अक्षरी र.रू.नव्याण्णव लाख पस्तीस हजार दोनशे एक्काहत्तर फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६५ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/३/२०१९ दि.०२/०१/२०१९

मा.अति.आयुक्त(२) यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी कामगार पुरविणे कामी देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे.

घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे बाबतच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून सदरकाम पुर्ण होणेसाठी काही कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीत आरोग्य विषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.,यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०१९ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत या पैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदत वाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.९६,४३,६५७/- (अक्षरी र.रु.शहान्नव लाख त्रेचाळीस हजार सहाशे सत्तावन्न फक्त) अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.अति. आयुक्त (२) यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयात नमुद केलेल्या कामास येणा-या अंदाजे र.रू.९६,४३,६५७/- (अक्षरी र.रू.शहाण्णव लाख त्रेचाळीस हजार सहाशे सत्तावन्न फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६६ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/४/२०१९ दि.०२/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी कामगार पुरविणेकामी देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. तसेच अ क्षेत्रीय कार्यालयाकडील पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/६६४/२०१८ दि.२७/१२/२०१८ अन्वये घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणेकामी सायंकाळचे वेळेस ६ टाटा ACE वाहने सुरु करणेसाठी ६+१ रिलीव्हर असे ७ वाहनचालक व १२+२ रिलीव्हर असे १४ सफाई कामगार व १ सुपरवायजर मिळणेकामी कळविलेले आहे व ब क्षेत्रीय कार्यालयाकडील प्र.क्र.१६ मध्ये घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणेकामी सायंकाळचे वेळेस ६ टाटा ACE वाहने सुरु करणेसाठी ६+१ रिलीव्हर असे ७ वाहनचालक व १२+२ रिलीव्हर असे १४ सफाई कामगार व १ सुपरवायजर मिळणेकामी कळविलेले आहे. त्यानुसार सदर संस्थेकडे ११८ सफाई कामगार, ५ सुपरवायजर व ६६ वाहनचालक इतके कर्मचारी होत असून त्यास मान्यता मिळावी. घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणेबाबतच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून सदरकाम पुर्ण होणेसाठी काही कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीत आरोग्य विषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०१९ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देईपर्यंत या पैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत

मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.१,०७,१३,४५६/-(अक्षरी र.रु. एक कोटी सात लाख तेरा हजार चारशे छप्पन फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयात नमुद केलेल्या कामास येणा-या अंदाजे र.रू.१,०७,१३,४५६/- (अक्षरी र.रु. एक कोटी सात लाख तेरा हजार चारशे छप्पन फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६७ विषय क्रमांक – २७

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/५/२०१९ दि.०२/०१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी कामगार पुरविणे कामी देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे. ड क्षेत्रीय कार्यालयाकडील पत्र क्र.डक्षेका/०८/कावि/४७३/२०१८ दि.०८/१०/२०१८ अन्वये कचरा उचलणेचे कामकाज पुर्ण क्षमतेने होणेकामी व नागरीकांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने संबंधीत आरोग्य निरिक्षक/ मुख्य आरोग्य निरिक्षक व सन्मा. सदस्य यांचे मागणीनुसार व कामाची निकड विचारात घेता. वाढीव ८ अधिक १ (रिलीव्हर) असे ९ वाहनचालक व १६ अधिक २ (रिलीव्हर) असे १८ कामगार पुरविणेची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील दि.३०/१०/२०१८ रोजीचे मान्य प्रस्तावान्वये मे. सावित्रीमहिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचे मार्फत वाढीव ८ अधिक १ (रिलीव्हर) असे एकूण ९ वाहनचालक व १६ अधिक २ (रिलीव्हर) असे एकूण १८ कामगार पुरविणेकामी दि.०१/११/२०१८ पासून मान्यता दिलेली आहे. तसेच अ क्षेत्रीय कार्यालयाकडील पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/६६४/२०१८ दि.२७/१२/२०१८ अन्वये घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणेकामी सायंकाळचे वेळेस ३ टाटा ACE वाहने सुरु करणेसाठी ३ वाहनचालक व ६+१ रिलीव्हर असे ७ सफाई कामगार मिळणेकामी कळविलेले आहे तसेच ब क्षेत्रीय कार्यालयाकडील प्र.क्र.२२ मध्ये घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणेकामी सायंकाळचे वेळेस ३ टाटा ACE वाहने सुरु करणेसाठी ३ वाहनचालक व ६+१ रिलीव्हर असे ७ सफाई कामगार मिळणेकामी कळविलेले आहे. त्यानुसार सदर संस्थेकडे १२६ सफाई कामगार, ७ सुपरवायजर व ७१ वाहनचालक इतके कर्मचारी होत असून त्यास मान्यता मिळावी. घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे बाबतच्या नविन निविदेचे कामकाज अंतिम टप्प्यात आले असून सदरकाम पुर्ण होणेसाठी काही कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीत आरोग्य विषयक कामाकरीता असलेली आवश्यकता विचारात घेवून मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या., यांची ठेकेदार म्हणून दि.०१/०१/२०१९

ते दि.३१/०३/२०१९ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नविन संस्थांना कामकाज आदेश देई पर्यंत या पैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या अंदाजे र.रु.१,२७,२२,१८२/- (अक्षरी र.रु.एक कोटी सत्तावीस लाख बावीस हजार एकशे ब्याऐंशी फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयात नमुद केलेल्या कामास येणा-या अंदाजे र.रु.१,२७,२२,१८२/- (अक्षरी र.रु.एक कोटी सत्तावीस लाख बावीस हजार एकशे ब्याऐंशी फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६८ विषय क्रमांक – २८
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – ब क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.बक्षेआ/५/कावि/२/२०१९ दि.०२/०१/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

निवडणूक जुने प्रभाग क्रमांक २१, २२, २३, २४, ४२, ५२ मधील दैनंदिन शौचालय साफसफाईकामी या पूर्वी मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.आ/४/कावि/१८४/२००८ दि.६/५/२००८ नुसार क्षेत्रीय अधिका-यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार स्थानिक बेरोजगारांच्या सहकारी संस्था, स्वयं सेवी संघटना यांचे कडून साफसफाईचे कामाचा करारनामा करुन घेणेत येतो. सदर आदेशानुसार असे करार जास्तीत जास्त ११ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी करता येतात. त्यानुसार ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील अशा प्रकारचे काम करणा-या संस्था मे. दीन महिला आधार रोजगार संस्था यांची व मे.महर्षि वाल्मिकी स्वयं रोज सेवा संस्थेची मुदत दि. ३१/१०/१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे मे.दीन महिला आधार रोजगार संस्था व मे.महर्षि वाल्मिकी स्वयं रोज सेवा संस्थां यांना पुढील नविन निविदा कार्यवाही पुर्ण होई पर्यंत मुदतवाढ देणेस मा.आयुक्त दिनांक २०/१२/१६ व दि.१८/३/१७ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत जुन्या प्रभाग रचनेनुसार प्र.क्र.२४ व ४२ अ प्रभागात समाविष्ट झाला असून ५२ चा ड प्रभागात समावेश झाला आहे. वरील आदेशात नमूद केलेप्रमाणे प्रति सीट २५०/- या दराने करुन घेणेस व दि.०१/११/२०१८ ते ३०/११/२०१८ पर्यंत येणा-या र.रू.१,५९,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्चाचे अवलोकन करणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयात नमुद केलेल्या कामास येणा-या अंदाजे र.रु.१,५९,०००/- (अक्षरी र.रु. एक लाख एकोणसाठ हजार फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०६९ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – अ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षे/कावि/७/२/२०१९ दि.०३/०१/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये भारतरत्न पंतप्रधान मा.अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र दर्शनी भागामध्ये बसविणेबाबत मा.महापौर सो यांनी मा.महापालिका सभा सभावृत्तांत, कार्यपत्रिका क्र.२१ दि.२०/०८/२०१८ मध्ये नमुद मा.महापालिका सभेमध्ये सुचना दिल्या आहेत. त्यानुसार दि.२०।०८।२०१८ रोजी मा.महापालिका सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सुप्रसिध्द चित्रकार श्री.सुनिल शेगांवकर यांनी त्यांची चित्रे मा.महापौर सो, मा.पक्षनेते व संबधित अधिकारी यांना दाखविली आहेत. सदरची चित्रे अत्यंत उत्कृष्ठ दर्जाची आहेत. तसेच मा.आयुक्त सो. यांनी दि.१२/१२/२०१८ चे प्रस्तावानुसार मा. अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र मनपा भवनात दर्शनी भागात लावण्यास मान्यता दिलेली आहे. सदर प्रकरणी चित्रकार श्री.सुनिल शेगांवकर यांचेकडुन भारतरत्न पंतप्रधान मा.अटलबिहारी वाजपेयी यांचे १ तैलचित्र, साईज- ८ फुट X ५ फुट (चित्राचे फ्रेमसह) साठी दरपत्रक घेऊन पुढील आवश्यक कार्यवाही करणेबाबतच्या सूचना मा.महापौर सो व मा.पक्षनेते यांनी दिलेल्या आहेत. तरी त्यांस अनुसरून श्री.सुनिल शेगांवकर, चित्रकार यांचे दि.२२/११/२०१८ चे कोटेशन नुसार दरपत्रक दिले असुन ८ फुट X ५ फुट साईजचे चित्रासाठी (चित्राचे फ्रेमसह) र.रू. ४,५१,०००/- प्रति नग जी.एस. टी. व इतर कराशिवाय खर्च येईल असे त्यांनी कळविले आहे. त्यानुसार भारतरत्न पंतप्रधान मा.अटलबिहारी वाजपेयी यांचे १ तैलचित्रासाठी फ्रेमसह र.रू.४,५१,०००/- इतका खर्च जी.एस.टी. व इतर कराशिवाय येईल. सदरचा खर्च सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील विशेष योजना" या लेखाशिर्षाअंतर्गत मुख्य प्रशासकीय इमारतीची देखभाल दुरुस्तीची कामे करणे (पान क्र.१८, अ.क्र.२०) या कामातुन करणे शक्य आहे. श्री.सुनिल शेगांवकर, चित्रकार यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभागृहासाठी स्व.बाळासाहेब ठाकरे व स्वांतत्रवीर सावरकर यांच्या चित्रकृती तसेच प्राध्यापक रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ४ चित्रकृती यापुर्वी केलेल्या आहेत. तसेच त्यांचा चित्रांच्या क्षेत्रात २५ वर्षापासुन हातखंडा असल्यामुळे भारतरत्न पंतप्रधान मा.अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र काढणेसाठी काम थेट पध्दतीने करणेची तयारी दर्शविली आहे. तरी वरील बाबींचा विचार करता सदरचे काम विशेष स्वरूपाचे असलेने त्यांचा या क्षेत्रातील अनुभव विचारात घेता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये दर्शनी भागात भारतरत्न पंतप्रधान मा.अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र काढणेसाठी करारनामा न करता थेट पध्दतीने काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०७० विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.हक्षेका/लेखा/कावि/३०७/२०१८ दि.२१/१२/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (1 ते 28) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०७१ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/३६१/२०१९ दि.०४/०१/२०१९

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या थेट पद्धत २०१८-१९ अन्वये सन २०१७-१८ करिता जलक्षेत्र क्र.ड/१ ते ड/१५ व बी/८ मधील सर्व जुन्या टाक्यांचे व संपचे सल्लागार नेमणूक करून स्ट्रक्चरल ऑडिट करणे. या कामासाठी मे.के.बी.पी.सिव्हील इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची र.रू.४४,९१,९०३/- (अक्षरी र.रू.चव्वेचाळीस लाख एक्यान्नव हजार नऊशे तीन फक्त) साठी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४०८०, दि.१०/०९/२०१३ मधील मंजूर दराने ठेकेदाराकडून र.रु.४४,९१,९०३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियम व अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०७२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/६/कावि/०९/२०१९ दि.०३/०१/२०१९

विषय - मनपाचे विद्युत विभागासाठी तातडीने आवश्यक विविध प्रकारचे बॅलास्ट साहित्य खरेदीबाबत.

विषय क्र.३२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०७३ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/८/कावि/१४११/२०१८ दि.११/१२/२०१८

विषय - मनपाचे पदव्युत्तर शिक्षण संस्थेकरिता नियतकालिके पुरविणेबाबत.

विषय क्र.३२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०७४ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/३०३/२०१८ दि.३१/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे वाकड येथील स.नं.१०८/३/२/ई मधील मंजुर विकास योजनेतील ३०.०० मी रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र मनपाचे ताब्यात देणेबाबतचा अर्ज श्री.जितेंद्र बाळासाहेब यादव यांचा दि.२०/११/२०१७ चा अर्ज (आवक क्र.७९५९ दि.२१/११/२०१७) नुसार अर्जदार यांनी या कार्यालयास सादर केलेला आहे. अर्जदार यांची ३०.०० मी रस्त्याने २७५.०० चौ.मी. क्षेत्र बाधित होत आहे. सदर प्रकरणी कायदा सल्लागार यांनी प्रत्यक्ष ताब्यास अधिन राहून पुढील कार्यवाही नियमानुसार ठेवण्यास हरकत नाही असा अभिप्राय दिलेला आहे. सदर प्रकरणी जाहीर नोटीस दिनांक १६।०९।२०१८ रोजी प्रसिध्द केलेली असून विहीत मुदतीत कोणाचीही हरकत या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. सदर प्रकरणी मुल्यांकन सन २०१८-१९ चे शिघ्र सिध्द गणकातील दरानुसार केलेले आहे. सदरचे मुल्यांकन एकूण र.रू.१,०३,५६,५००/- (अक्षरी र.रु.एक कोटी तीन लाख छपन्न हजार पाचशे फक्त) इतके मुल्यांकन येत आहे. सदरचे मुल्यांकनास मा.आयुक्तसो. यांनी दिनांक २६/०७/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तदनंतर या कार्यालयाने सदरचे मंजूर मुल्यांकन अर्जदारास दिनांक ०७/०८/२०१८ अन्वये कळविणेत आलेले आहे. अर्जदाराने दिनांक ०९/०८/२०१८ नुसार सदरचे मुल्यांकन मान्य असलेबाबत या कार्यालयास कळविलेले आहे. श्री जितेंद्र बाळासाहेब यादव यांचेकडून ३०.०० मी रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात घेणेकामी श्री. जितेंद्र बाळासाहेब यादव यांचकडून खरेदीखत करून नुकसान भरपाई धनादेशाद्वारे र.रू.१,०३,५६,५००/- अदा करावी लागेल तसेच रजिट्रेशन फी र.रू.३०,०००/- व स्टँम्प ड्युटी र.रू.६,२१,४००/- असे एकुण र.रू.१,१०,०७,९००/- (अक्षरी र.रू.एक कोटी दहा लाख सात हजार नऊशे फक्त) चा खर्च तसेच खरेदीखतासाठी, वकील फी व इतर खर्च र.रू.५०००/- असे एकुण र.रू.१,१०,१२,९००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -४०७५ विषय क्रमांक – ३५
दिनांक – ०८/०१/२०१९ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/३०४/२०१८ दि.३१/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

